एकलव्य निवासी शाळांमधील कर्मचाऱ्यांना नवोदय विद्यालयाच्या धर्तीवर सुधारित वेतनश्रेणी/मानधन निश्चित करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः शाआशा -२०१७/ प्र. क्र. ४९२ /का-१३**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई:- ४०० ३२.
दिनांक :- ३ डिसेंबर, २०१८

वाचा :-

१) शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग,क्रमांक:शाआशा-२०१३/प्र.क्र.६८२/का-१३ दिनांक ७ मे, २०१५.

प्रस्तावना :-

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे या हेतुने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद **२७५ (१)** अन्वये वितरीत होणाऱ्या निधीतून आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरावर निवासी शाळा स्थापन करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. त्यास अनुसरून आज अखेर राज्यामध्ये १४ एकलव्य निवासी शाळा सुरु करण्यात आलेल्या आहेत. सदर शाळांमध्ये केंद्रीय माध्यमिक शिक्षा बोर्ड, नवी दिल्ली यांच्या अभ्यासक्रमानुसार इ. ६वी ते १२वी पर्यंतचे वर्ग टप्याटप्याने सुरु केलेले आहेत. सदर शाळांसाठी संदर्भाधीन दि. ७/५/२०१५ च्या शासन निर्णयान्वये शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचा आकृतिबंध व वेतनश्रेणी/मानधन निश्चित करण्यात आले आहे. महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कूल सोसायटी, नाशिक या संस्थेच्या दिनांक १८ सप्टेंबर, २०१७ च्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत केलेला ठराव लक्षात घेऊन एकलव्य निवासी शाळेतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नवोदय विद्यालयाच्या धर्तीवर वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

१) नवोदय विद्यालयाच्या धर्तीवर एकलव्य निवासी शाळेतील शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता राखण्यासाठी सदर शाळेतील प्राचार्य, शिक्षक, पुरुष आणि स्त्री अधिक्षक यांना नवोदय विद्यालयाच्या धर्तीवर खालीलप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करण्यात येत आहे. सदर सुधारीत वेतनश्रेणी दिनांक १ जानेवारी, २०१८ पासुन लागू राहील. त्यावर नियमानुसार देय महागाई भत्ता देय राहील. सदर खर्चासाठी केंद्र शासनाच्या निधीव्यतीक्त उर्वरीत निधी राज्य योजनेतून उपलब्ध करून देण्यात येईल.

| अ. क्र. | पदनाम | श्रेणी | पदनिहाय वेतनश्रेणी | ग्रेड पे |
|---|---|---|---|---|
| १ | प्राचार्य | -- | रू.१५६०० - रू.३९१०० | रू. ७६०० |
| २ | पदव्युत्तर पदवीधर प्रशिक्षित शिक्षक | प्रथमश्रेणी | रू.९३०० - रू.३४८०० | रू. ४८०० |
| | | वरीष्ठश्रेणी | रू.१५६००-रू.३९१०० | रू.५४०० |
| ३ | प्रशिक्षित पदवीधर शिक्षक | प्रथमश्रेणी | रू.९३०० - रू.३४८०० | रू. ४६०० |
| | | वरीष्ठश्रेणी | रू.९३०० - रू.३४८०० | रू.४८०० |
| ४ | क्रिडा शिक्षक नि विषय अध्यापक | -- | रू.९३०० - रू.३४८०० | रू. ४६०० |
| ५ | अधिक्षक ( पुरुष ) प्रशिक्षित पदवीधर | -- | रू.९३०० - रू.३४८०० | रू. ४६०० |
| ६ | स्त्री अधिक्षिक कम् -नर्स (प्रशिक्षित पदवीधर ) | -- | रू.९३०० - रू.३४८०० | रू. ४६०० |

२) एकलव्य निवासी शाळेतील प्राचार्य,शिक्षक, पुरुष व स्त्री अधिक्षक यांना प्रथम दोन वर्षासाठी परीविक्षाधिन कालावधी असेल. सदर कालावधीतील त्यांच्या सेवेचा दर्जा तपासून समाधानकारक असल्यास त्यांचा परिविक्षाधिन कालावधी संपुष्टात आणून वेतनवाढ देण्याबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कूल सोसायटी, नाशिक यांचेकडून निर्णय घेण्यात येईल.

३) एकलव्य निवासी शाळेचे निवासी स्वरूप,शाळा परीसरात उपलब्ध करून देण्यात आलेली निवासस्थाने विचारात घेवून निवासस्थान उपलब्ध असणा-या कर्मचा-यांना घरभाडेभत्ता व वाहतूक भत्ता देय राहणार नाही. निवासस्थान उपलब्ध नसणा-या कर्मचा-यांना नियमानुसार घरभाडेभत्ता व वाहतूक भत्ता देय राहील. तसेच सदर कर्मचाऱ्यांना एकलव्य निवासी शाळेतील कर्मचा-याना अन्य कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

४) एकलव्य निवासी शाळेमध्ये कार्यरत कर्मचारी महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कूल सोसायटी, नाशिक यांचे अंतर्गत कार्यरत असल्याने एकलव्य निवासी शाळेतील कोणाही कर्मचाऱ्यांना गटविमा योजना, सेवानिवृत्तीनंतर निवृत्ती वेतन, मृत्यू-नि-सेवा उपदान यासह अन्य कोणतेही आर्थिक लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत.

५) संस्थेत कायमस्वरूपी नोकरीचा हक्क सांगता येणार नाही या अटीच्या अधिन राहून प्रत्येक एकलव्य निवासी शाळेत शिपाई या चतुर्थश्रेणी सेवकांचे पद प्राचार्य स्तरावरून बाहयस्त्रोतावर (Outsourcing) पदध्तीने भरण्यात येतील.

६) एकलव्य निवासी शाळांमधील सुरक्षा व सफाईचे कामे विहित पध्दतीने निविदा मागवून प्राचार्य यांचे स्तरावरून बाह्य संस्थांमार्फत करून घेण्यात येतील.

७) एकलव्य निवासी शाळांचा खर्च भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अन्वये केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीतून भागविण्यात येईल. राज्यस्तरावरून देण्यात येणारा खर्च मागणी क्रमांक टि-५, २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, जनजाती क्षेत्र उपयोजना, ०२,अनुसूचित जमातीचे कल्याण, ७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना , भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) अन्वये केंद्रिय सहाय्य, (०१)( ४४ ) आश्रमशाळा समूह (केंद्र योजना ) ( २२२५ २५८७ ) या लेखाशिर्षाखाली मंजुर तरतुदीतुन भागविण्यात यावा.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१८१२०४११४६०३७१२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Subrao Narayan Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859eae7920c9d0d1f622, cn=Subrao Narayan Shinde
Date: 2018.12.04 11:52:11 +05'30'

**( सु. ना. शिंदे. )**

उप सचिव, आदिवासी विकास विभाग.

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.४०० ०३२.
३. मा.मंत्री (आदिवासी विकास), मंत्रालय, मुंबई :- ४०० ३२.
४. सर्व मा. मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

५. मा. राज्यमंत्री (आदिवासी विकास), मंत्रालय, मुंबईः- ४०० ०३२.
६. सर्व मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
७. सर्व मा. विधानसभा सदस्य.
८. सर्व मा. विधानपरिषद सदस्य.
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०. मा. सचिव, आदिवासी विकास, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
११. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
१२. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक . (५ प्रती)
१३. अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे / नाशिक / अमरावती / नागपूर
१४. महालेखापाल ( लेखा परिक्षा ) / ( लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र- १, मंबई .
१५. महालेखापाल ( लेखा परिक्षा ) / ( लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र- २, नागपूर.
१६. प्रकल्प अधिकारी (सर्व), एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
१७. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
१९. शिक्षणाधिकारी ( प्राथमिक व माध्यमिक ) जिल्हा परिषद,सर्व.
२०. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
२१. जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व..
२२. तालुका कोषागार अधिकारी, सर्व.
२३. शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२४. वित्त विभाग ( व्यय-११ / अर्थ-१७ ) मंत्रालय, मुंबई.
२५. सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२६. सचिव, भारत सरकार, जनजाती कार्य मंत्रालय, शास्त्री भवन, नवी दिल्ली.
२७. संचालक, भारत सरकार, जनजाती कार्य मंत्रालय, शास्त्री भवन, नवी दिल्ली.
२८. कार्यासन- १९, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२९. सर्व उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
३०. निवड नस्ती ( का.१३ ), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.